# प्रेसनोट

दि. ०५/०४/२०२३

सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १५३/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - २२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक शशिकांत नारायण पवार, पोलीस उपनिरीक्षक, अभिरुची पोलीस चौकी, सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- (वीस हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २५/०१/२०२३

गुन्हा दाखल दिनांक :- ०५/०४/२०२३

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे मालकीची मारुती इर्टीगा कार त्यांचा बदली चालक परस्पर घेवून, कर्नाटक येथे निघून गेला होता. सदरचे वाहन परत मिळवून देणेकामी तक्रारदार यानी सिंहगड रोड पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दिला होता. ती कार परत मिळवून देण्यासाठी केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून लोकसेवक शशिकांत पवार यानी ५०,०००/- (पन्नास हजार रुपये) लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार यानी तक्रारदार यांचेकडे प्रथम ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती २०,०००/- रुपये लाचेची मागणी केली म्हणून वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार याना अटक करण्यात आली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक विजयमाला पवार तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

( श्रीहरी पाटील )
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.